# रे.मु.नं.९६/१४ मधील नि.क.३५ वरील आदेश

**कृष्णा घरत, वगैरे** ... **वादी**
**वि.**
**नामदेव घरत, वगैरे** ... **प्रतिवादी**

१. वादींचा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १६ अन्वये दाखल अर्ज वाचला. त्या अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे नि.क्र. ३७ कडील म्हणणे वाचले. प्रकरणात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. वादींतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकतीबाबत झालेले मौजे शेवे येथील ॲवार्डबाबत कुठलीही मागणी केलेली नाही अथवा ती रददबातल करण्याची मागणी केलेली नाही. परंतु, त्यांच्या दाव्यातील परिच्छेद क्र. ७ मधील पान क्र. ७ वरील वरच्या परिच्छेदात त्याअनुशंगाने त्या मिळकतीबाबत झालेले मौजे शेवे येथील ॲवार्ड वादींवर बंधनकारक नाही ही ओळ त्यांना काढून टाकायची आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नसल्यामुळे सदर अर्ज मंजूर करण्यात यावा.
नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा.

३. याउलट, प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे वकीलांनी असा युक्तिवाद केला आहे की, वादींच्या म्हणण्याप्रमाणे जर अर्ज मंजूर केला तर दाव्याचे मूळ स्वरुपामध्ये बदल होईल. वादींचा अर्ज हा सद्‌भावनेचा नसल्यामुळे तो नामंजूर करण्यात यावा.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हा जाहिर ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता वादींनी दाखल केलेला असुन

तो स्थावर मिळकतीसंदर्भात आहे. दावा पाहता, वादींनी त्यांच्या दाव्यात दावा मिळकतीसंदर्भात मौजे शेवे येथील ॲवार्ड त्यांच्यावर बंधनकारक नाही अथवा ते रददबातल करुन मागितल्याची विनंती कलमामध्ये दिसून येत नाही. त्यामुळे वादी सदर अर्जात कथन करीत असल्याप्रमाणे अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांचा बचाव कोणत्याही प्रकारे बाधीत होणार नाही. त्यामुळे वरील बाबींचा परिस्थितीचा व अर्जातील कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात आला आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज (नि.क्र.३५) मंजूर करणेत येत आहे. |
| २. | खर्चाबाबत आदेश नाही. |

उरण.　　　　　　　　　　( प्रि.म.पाटील )
दिनांक : १५/१०/२०१८　　　　दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.